# महाराष्ट्र शासन

## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,

**४१२,ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६**

**Web : www.dhepune.gov.in** **E-Mail : mavi.dhepune@gov.in**

फोन नं.०२०/२६१२२११९


क्र.: उशिसं/गणेशोत्सव कालावधी परिक्षा आयो. /मवि-१/२०२५/ई. २१११९०१ दि.२८/०८/२०२५

प्रति,

१. कुलसचिव,
सर्व अकृषी/अभिमत /स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे.

२. प्राचार्य/ संचालक,
सर्व शासकीय / अशासकीय, अनुदानित / विना अनुदानित / कायम विना अनुदानित महाविद्यालये महाराष्ट्र राज्य.

**विषयः गणेशोत्सव कालावधीत परीक्षांच्या आयोजनाबाबतच्या सूचना.**

संदर्भः- १. शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२५/ई-१३०२४४१/विशि-३ दि.२६ ऑगस्ट २०२५

२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र.पुलदे-२०२५/प्र.क्र.११४ (१२५५४१२) सां.का.२ दि.१४.८.२०२५

उपरोक्त विषयाबाबत पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय दि.१४.८.२०२५ अन्वये गणेशोत्सव हा **"राज्य महोत्सव"** म्हणून घोषित केलेला आहे. गणेशोत्सव कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. सदर उत्सवाला दिलेले राज्य महोत्सवाचे स्वरुप विचारात घेता, आपल्या विद्यापीठांतर्गत उच्च शिक्षण संस्थांतर्गत परीक्षांचे आयोजन गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशी या कालावधीत (अकरा दिवस) शक्यतो टाळावे. तसेच, या कालावधीत परीक्षा निश्चित केल्या असल्यास सदर परीक्षांचे पुनर्नियोजन करण्याबाबत विचार व्हावा, असे संदर्भांकीत शासन पत्र दि.२६ ऑगस्ट २०२५ अन्वये निर्देश दिलेले आहेत.

त्यानुषंगाने विषयांकित प्रकरणी आपल्यास्तरावरुन उचित कार्यवाही करण्यात यावी.

सोबत : वरीलप्रमाणे.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 28-08-2025 19:09:40

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग ,मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक ४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२७९३१७१ Email ID: -vishi3-hted@mah.gov.in

क्रमांक:संकीर्ण-२०२५/ई- १३०२४४१ /विशि-३ दिनांक: २६ ऑगस्ट, २०२५

प्रति,

१. कुलगुरु, सर्व सार्वजनिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
२. कुलगुरु,सर्व स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
३. कुलगुरु, सर्व अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
४. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. संचालक/प्राचार्य, सर्व उच्च शिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य.

**विषय : गणेशोत्सव कालावधीतील परीक्षांच्या आयोजनाबाबतच्या सूचना.**

संदर्भ : पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र. पुलदे-
२०२५/प्र.क्र.११४(१२५५४१२)/सां.का.२, दि.१४.०८.२०२५.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये गणेशोत्सव हा **राज्य महोत्सव** म्हणून घोषित करण्यात आला आहे. गणेशोत्सव कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. सदर उत्सवाला दिलेले राज्य महोत्सवाचे स्वरूप विचारात घेता, आपल्या विद्यापीठांतर्गत/उच्च शिक्षण संस्थांतर्गत परीक्षांचे आयोजन गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशी या कालावधीत (अकरा दिवस) शक्यतो टाळावे. तसेच, या कालावधीत परीक्षा निश्चित केल्या असल्यास सदर परीक्षांचे पुनर्नियोजन करण्याबाबत विचार व्हावा.

आपली,
सं.पं.जाधव
(संचिता जाधव)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मा. मुख्यमंत्री, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

४. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती (विशि-३).

**गणेशोत्सव हा "राज्य महोत्सव" म्हणून साजरा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- पुलदे-२०२५/प्र.क्र.११४(१२५५४१२)/सां.का.२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक: १४ ऑगस्ट, २०२५

**वाचा :** १) शा.नि. क्र.: पुलदे-२०२५/प्र.क्र. ७४ (ई-११४४०९५) सां.का.२, दि.२० जून २०२५.
२) मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांनी शुक्रवार दि. १८ जुलै २०२५ रोजी विधिमंडळात गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करणेबाबत केलेली घोषणा.
३) संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांचे दि.२५.०७.२०२५ चे पत्र

**प्रस्तावना**:

लोकमान्य टिळकांनी जुलमी ब्रिटिश सत्तेविरुद्ध जनजागृती व जनतेला संघटित करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्याची प्रथा सुरू केली. या निमित्ताने सामाजिक एकोपा आणि संघटनात्मक चळवळी तसेच विविध कला, देखावे आणि सांस्कृतिक उपक्रम यांच्याद्वारे देशहिताचा व्यापक विचार समाजात रुजवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य झाले.

राज्याच्या वैविध्यपूर्ण सांस्कृतिक परंपरेत गणेशोत्सव हा अत्यंत लोकप्रिय आणि राज्याची देशविदेशात सांस्कृतिक ओळख निर्माण करून देणारा असा उत्सव आहे. गणेशोत्सव काळात राज्यात मोठ्या प्रमाणात पर्यटन, त्यावर आधारित विविध उद्योग व व्यवसाय यांना चालना मिळत असून राज्यात एकूणच सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक अभिसरण होते. त्यामुळे ही परंपरा व संस्कृति जपली जावी, वृद्धिंगत व्हावी, यासाठी **गणेशोत्सव हा "राज्य महोत्सव"** म्हणून साजरा करण्याची घोषणा मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांनी दि. १८ जुलै २०२५ रोजी राज्य विधिमंडळात केली आहे. त्यास अनुसरून **गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव'** म्हणून साजरा करणे ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय-**

राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव हा "**राज्य महोत्सव**" म्हणून साजरा करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या अनुषंगाने राज्यातील गणेशोत्सवानिमित्त अधिकाधिक व्यक्ती, संस्था आणि विविध समाजघटकांना सामाजिक सलोख्यासाठी एकत्रित आणणे, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर साजऱ्या होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवास प्रोत्साहन देणे, विविध सांस्कृतिक विषयांचे जतन व संवर्धन करणारे उपक्रम उदा. विविध स्पर्धा, व्याख्यानमाला इ. आयोजित करणे, महाराष्ट्रात शिकणाऱ्या परदेशातील तसेच अन्य राज्यांतील विद्यार्थ्यांना या राज्य उत्सवात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे इ. उपक्रमांसह, गणेशोत्सव हा '**राज्य महोत्सव**' म्हणून साजरा करण्यास शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर राज्य महोत्सवांतर्गत आयोजित करण्यात येणारे उपक्रम व इतर कार्यक्रमांचे समन्वयन कार्यालय म्हणून पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई या कार्यालयाला घोषित करण्यात येत आहे. तसेच सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत असणाऱ्या विविध कार्यालयांमार्फत व जिल्हाधिकारी कार्यालयांमार्फत खालील कार्ये प्रस्तावित आहेत:-

| अ.क्र. | विभाग | कार्ये |
|---|---|---|
| १ | सांस्कृतिक कार्य संचालनालय | • राज्यातील नोंदणीकृत तसेच भजन क्षेत्रातील शिखर संस्थांनी प्रमाणित केलेल्या भजनी मंडळांना भांडवली खर्चासाठी अनुदान देण्यात येईल. या संदर्भातील अटी व शरतींचा शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. यासाठी ५ कोटी रुपये इतकी तरतूद करणे.<br>• राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर साजऱ्या होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवास प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रमांचे स्थानिक संस्थांच्यासोबत सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजन करणे.<br>• गणेशोत्सवाच्या निमित्ताने अध्यात्म नाट्यरंग महोत्सवाचे आयोजन करणे.<br>• प्रामुख्याने राजधानीच्या शहरात ड्रोन शोचे आयोजन करणे.<br>• राज्य महोत्सव टपाल तिकिट काढणे.<br>• राज्य महोत्सव विशेष नाणे प्रसिध्द करणे. |
| २ | पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी | • उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर पुरस्कृत करणे. राज्यातील सुमारे ४८० सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सुमारे १.५० कोटी रुपये इतक्या रकमेची पारितोषिके वितरित करणे.<br>• या स्पर्धांचे राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांकरिता पारितोषिक वितरण समारंभ अकादमीतर्फे आयोजित करणे.<br>• गणेशोत्सवाच्या निमित्ताने राज्य व्याख्यानमालेचे आयोजन करणे.<br>• राज्यातील प्रमुख गणेश मंदिरे आणि सार्वजनिक गणेशोत्सव यांचे ऑनलाइन दर्शन करता यावे, याकरिता एक पोर्टल निर्माण करणे.<br>• घरगुती गणेशोत्सवाची छायाचित्रे अपलोड करता यावीत, याकरिता एक डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | • या राज्य महोत्सवाची माहिती संपूर्ण देशभर व्हावी याकरिता वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, रेडिओ आणि समाज माध्यमे यांच्या माध्यमातून देशभरात प्रचार व प्रसिद्धी करणे.<br>• उपरोक्त बाबींचा एकत्रित शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल. |
| ३ | दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव | • दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव यांच्या माध्यमातून साजरा करण्यात येणाऱ्या गणेशोत्सवाला व्यापक स्वरुप यावे, या अनुषंगाने विविध सांस्कृतिक कार्यक्रम, उपक्रम हाती घेणे.<br>• गणेशोत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण राज्यभरातून गणपती विषयक रिल्स स्पर्धा महसूल विभागीय व राज्यस्तरावर आयोजित करणे.<br>• ज्या मराठी चित्रपटांमधून गणेशोत्सवाशी संबंधित परंपरा व प्रथा यांचे उत्तम चित्रण करण्यात आले आहे, अशा चित्रपटाचा गौरव करणे. |
| ४ | सर्व जिल्हाधिकारी | • उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळ स्पर्धेसाठी तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय समित्या गठित करणे, स्पर्धेसाठी अकादमीतर्फे पाठविण्यात आलेल्या अर्जाचे प्रत्यक्ष भेटीद्वारे समितीमार्फत परिक्षण करणे, गुणांकन करणे व अंतिम निकालपत्र अकादमीकडे पाठविणे.<br>• राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आल्यानंतर तालुका व जिल्हास्तरीय (द्वितीय व तृतीय) विजेत्यांसाठी पारितोषिक वितरण समारंभ संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांमार्फत करणे.<br>• राज्य महोत्सवाच्या अनुषंगाने शहरांतील प्रमुख ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई, विसर्जन मिरवणुकांचे संयोजन व समन्वयन करणे.<br>• शासन निर्णयामध्ये नमूद उपक्रम, कार्यक्रम यांचे स्थानिक स्तरावर नियंत्रण, समन्वयन आणि प्रचार व प्रसिध्दी करणे. |

३. उपरोक्त तक्त्यामधील नमूद यंत्रणांनी सदर प्रस्तावित कार्यक्रम / उपक्रमांच्या अनुषंगाने स्वतंत्रपणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

४. उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळ स्पर्धेच्या संदर्भीय क्रमांक १ येथील शासन निर्णयामध्ये अनुषंगिक सुधारणा करुन स्वतंत्रपणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

५. उपरोक्त परिच्छेदामध्ये दर्शविण्यात आलेल्या कार्यक्रमांच्या/उपक्रमांच्या संदर्भात आवश्यक असलेला खर्च हा संबधित कार्यालयांनी त्यांना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या निधीतून भागवावा.

६. सर्व जिल्हाधिकारी यांनी गणेशोत्सव हा **राज्य महोत्सव** म्हणून साजरा व्हावा यासाठी सदर शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या कार्यक्रम/उपक्रमांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२५०८१४१७२९०९३६२३ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NANDA MARUTI RAUT

Digitally signed by NANDA MARUTI RAUT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL DEPARTMENT, 2.5.4.20=281d8ee0076aee3a052a490903f93deadef9f7e2a186620ec03666d244838270, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BAF9D9317025580944685E047B9C52D64C532684054F19E1F02C374B78E1773F, cn=NANDA MARUTI RAUT
Date: 2025.08.14 17:31:56 +05'30'

**(नंदा राऊत)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन , मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सचिव (सांस्कृतिक कार्य) यांचे स्वीय सहायक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी.
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व सर्व पोलीस आयुक्त.
७. महालेखापाल लेखा परीक्षा/लेखा अनुज्ञेयता महाराष्ट्र-१, मुंबई.
८. व्यवस्थापकीय संचालक,दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई.
९. उप सचिव (सां.का.२), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. उप सचिव (सां.का.४), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई.
१२. व्यवस्थापकीय संचालक, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई.
१३. संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी,मुंबई.
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६. अवर सचिव/कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. अवर सचिव/कक्ष अधिकारी (सां.का.२), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. निवडनस्ती,सां.का.२